कॉलेज परिसर कॅन्टीन कोरीनिविधा दरपत्रक विक्री

श्री तुळजा भवानी मंदीर संस्थान संचलीत

# श्री तुळजा भवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर 413601 जि. उस्मानाबाद

00001

Ph No. 02471 243603. Email- stbcet@gmail.com Web – www.stbcet.org.in

जा.क्र./श्री तुभअम/भांडार/2019/ दिनांक – / /2019

श्री तुळजा भवानी अभियांत्रीकी महाविद्यालय तुळजापूर जि उस्मानाबाद गेट नं 02 जवळील ( कॅन्टीन/मेस साठी) दर पत्रकाच्या अटी व शर्ती

महाविदयालय परिसर कॅन्टीन/मेस चालविण्या-या ईच्छूक अनुभवी व्यावसायिक ठेकेदारानी खालील खादय पदार्थ, पेय, जेवण, मासिक मेंबरशिप, कॅन्टीनचे भाडे ई. बाबतचे दर खालील अटी व शर्तीस अधिन राहून सादर करावेत.

| अ.क्र | पदार्थाचे नाव | दर प्रति नग/ प्लेट/ 50 ग्रॅम | अ.क्र | पदार्थाचे नाव | दर प्रति नग/ प्लेट/ 50 ग्रॅम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | साधा चहा | | 13 | शाबू वडा | |
| 2 | स्पेशल चहा | | 14 | नायलॉन शाबू | |
| 3. | साधी कॉफी | | 15 | राईस प्लेट | |
| 4 | नेस कॉफी | | 16 | फुल जेवन | |
| 5 | दुध ग्लास | | 17 | मसिक मेंबरशिप | |
| 6 | शिरा | | 18 | भाजी | |
| 7 | उपिट/उपमा | | 19 | भात | |
| 8 | कांदा पोहे | | 20 | चपाती | |
| 9 | भजे | | 21 | वरण | |
| 10 | पुरी भाजी | | 22 | मठ्ठा 1 ग्लास | |
| 11 | बटाटा वडा | | 23 | लस्सी 1 ग्लास | |
| 12 | इडली सांबर | | 24 | कॅटिन व मेसचे वार्षिक भाडे (20000/-) पेक्षा जास्त नमूद करावे. | |
| | | | | | |

Scanned by CamScanner

1. कॅन्टीन/मेस चालवू ईच्छीणा-या ठेकेदाराने उत्तम प्रतिचे खाद्यपदार्थचा पुरवठा करावा लागेल. प्राचार्य ,उपप्राचार्य, प्रबंधक यांच्याकडुन अचानक खाद्यपदार्थाची तपासणी केली जाईल. कॅन्टीन/मेस निरिक्षक समिती यांचेकडुन महिन्यातून एक वेळेस नियमित खाद्य पदार्थाची/अन्नधान्य/भाजीपाला ई. दर्जाबाबतची तपासणी करून अहवाल प्राचार्य यांचेकडे पाठविण्यात येईल. अहवालामध्ये जर त्रुटी/तकार आढळून आल्यास या बाबत काय कार्यवाही करावयाची आहे याचा अंतिम निर्णय प्राचार्य यांचा राहील.

2. अन्न सुरक्षा अधिनियम 2006 व अंतर्गत नियम व नियमन 2011 नुसार शासकीय व निमशासकीय कार्यायलयामार्फत अन्न पदार्थाची होत असलेली विक्री करीता कॅन्टीन/मेसमध्ये खाद्यपदार्थ ई. चालकांना दरपत्रक धारकांना सिलबंद दरपत्रक दोन पाकीट पध्दतीने खालील प्रमाणे महाविदयालयास सादर करावयाचे आहे

1.दरपत्रक निविदा पाकिट क. 1. तांत्रिक लिफाफा मध्ये खालील प्रमाणे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

1. अन्न व भेसळ परवाना नोंदणी नुतनिकरण असणे आवश्यक आहे व सदर परवाना नुतनिकरण केलेला असावा.
2. शॉप्स व ईस्टॅब्लीशमेंट ॲक्ट परवाना नुतनिकरण असणे आवश्यक आहे सदर परवाना नुतनिकरण केलेला असावा.
3. अटी व शर्ती मान्यतेचे प्रमाणपत्र

वरील कागदपत्र तांत्रिक लिफाफा क.1 उघडल्यानंतर आढळून नाही आल्यास लिफाफा क.2 व्यापारी लिफाफा उघडला जाणार नाही त्यामुळे सदरील दरपत्रक रद्द करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

2. दरपत्रक निविदा पाकीट क.2 व्यापारी लिफाफा मध्ये दरपत्रकामधील खाद्य पदार्थाचे दर व कॅन्टीन/मेसचे भाडे स्वच्छ अक्षरात नमुद करावे. यामध्ये खाडाखोडा ओव्हरायटींग करू नये. तसेच दरपत्रकावर स्वत;च्या अटी व शर्ती चा उल्लेख करू नये. अनावश्यक कागदपत्र प्रमाणपत्र जोडू नयेत.

वरील पाकीट क.1 व पाकीट क. 2 एका मोठया पाकीटामध्ये घालुन महाविदयालयात विहीत वेळेत सादर करावे.

3. महाविदयालयाने एकदा ठरवून दिलेले चहा, खाद्य पदार्थ, जेवणाचे दर पुढील दोन वर्षापर्यत कायम राहतील. यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. मान्यताप्राप्त खाद्यपदार्थ,चहा,पेय, जेवण ई. बाबतची दरसुची ठेकेदाराने समोरील दर्शनी भागात दाखवावी. महाविदयालयाकडून मान्यताप्राप्त दरसुची वरील दरामध्ये बदल केल्यास विदयार्थीनी प्राचार्य,उपप्राचार्य, प्रबंधक यांचेकडे तकार करू शकतात.
4. ठेकेदारांनी महाविदयालय परिसर कॅन्टीनची सोय जागा, पाण्याची उपलब्धता, लाईट बील,कर्मचारी विदयार्थी संख्या, विदयार्थीचे वार्षीक वेळापत्रक परिक्षा सुटटया ई. बाबत चौकशी करूनच दरपत्रकाची दर भरावेत. पुन्हा नंतर दरवाढ करता येण्यार नाही याची नोंद घ्यावी.

Scanned by CamScanner

5. महाविदयालय कॅन्टीन/मेस ठेकेदारास तंबाखू मावा गुटखा किंवा इतर तत्सम मादक पदार्थ विक्री करणे किंवा बाळगण्यास शासकीय नियमानूसार बंदी आहे. असे पदार्थ आढळुन आल्यास शासकीय नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

6. खाद्यपदार्थ शितपेय,चहा, कॉफी, मासिक मेंबरशिप जेवण ई. बाबत सर्वात कमी दराने व कॅन्टीन/मेससाठी वार्षीक भाडे सर्वाधिक देणारा ठेकेदारास तसेच सर्व अटी व शर्ती कागदपत्र पुर्तता केल्यानंतर व 100रू.च्या शपथपत्रावर करारनामा नोटरी करून पुर्तता केल्यानंतरच आदेश देण्यात येतील.

7. कॅन्टीन/मेसचे वार्षीक भाडे लाईटबील, ठेकेदाराने महिन्याचे महिन्याला भरणा करणे बंधनकाराक आहे.

8. महाविदयालयाच्या कॅन्टीन/मेसची वेळ सकाळी 7.00 पासून ते संध्याकाळी 7.00 पर्यत राहील.

9. पाणीपुरवठा कॅन्टीन/मेससाठी पाणीपुरवठा महाविदयालयाच्या नियमित स्त्रोताव्दारे देण्यात येईल. महाविदयालय नगरपालिकेचा पाणीपुरवठा तांत्रिक बिघाडामूळे बंद पडल्यास किंवा कमी पुरवठा होत असल्यास ठेकेदाराने स्वत; पाण्याची व्यवस्था करावी लागेल.या बाबत कसल्याही प्रकारची तकार चालणार नाही.

10. विदयुत पुरवठा महाविदयालयाचे कॅन्टीन/मेससाठी विदयुत पुरवठा देण्यात येईल.विदयुत सबमिटर रीडिंग प्रमाणे प्रति यूनिट 12 रू या दराने दरमहा देयक अदा करावे लागेल. सलग 02 महिने लाईटबिल थकित राहिल्यास 3 महिन्यामध्ये विदयुत पुरवठा खंडित केला जाईल याबाबत कसलाही तकार चालणार नाही. विदयुत शेगडीचा वापर करण्यात येवु नये. केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

11. डीपॉझीट यशस्वी ठेकेदाराकडुन रू. 5000/- अनामत रक्कम महाविदयालयाकडे ठेवण्यात येईल. सदर रक्कम दोन वर्षाचा कालावधी संपल्यानंतर ठेकेदारास परत केली जाईल. ठेकेदारावर काही दंडात्मक कार्यवाही झाल्यास अनामत रक्कमेतून दंड वजा करून उर्वरीत रक्कम ठेकेदारास परत करण्यात येईल. तसेच 2 वर्षाच्या संपूर्ण कालावधी जर ठेकेदाराने पुर्ण केला नाही 2 वर्षे पुर्ण होण्याच्या अगोदर कॅन्टीन/मेस बंद करणे बाबत अर्ज दाखल केल्यास अनामत रक्कम रू. 5000/- जप्त करण्यात येईल.

12. कॅन्टीन/मेससाठी भांडे, ताट, फर्निचर, फॅन, खुर्ची, टेबल ई. साहित्या ठेकेदाराचे स्वत;चे असेल. महाविदयालयातुन कोणतेही फर्निचर अथवा साहित्या मिळणार नाही.

13. श्री तुळजाभावानी मंदीर संस्थानच्या नियमानुसार वेळोवेळी देण्यात येणारे निर्देश प्राचार्य,उपप्राचार्य,प्रबंधक,भांडारपाल यांनी दिलेल्यासुचनांचे काटेकोरपणे पालन करावे तसेच कर्मचारी व विदयार्थीनी यांच्याकडून कोणतीही तकार येणार नाही याची खबरदारी घ्यावी.

Scanned by CamScanner

14. निर्धारित दोन वर्षाच्या कालावधीत महाविद्यालय व ठेकेदार यांच्यामध्ये जर काही मुद्यावरून वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय प्राचार्य यांचा राहिल व न्यायक्षेत्र तुळजापूर पर्यत मर्यादित असेल. याबाबतचा उल्लेख करारनामा मध्ये करण्यात आलेला आहे.

15. ज्या दरपत्रकधारकाने कॅन्टीन/मेस चालविण्यासाठी कागदपत्र परवाने दाखल केले आहेत. त्यांनाच कॅन्टीन/मेस चालविणे बंधन कारक आहे. यामध्ये पोट भाडेकरू चालणार नाही. तसेच आढळुन आल्यास कॅन्टीन/मेस चालविणे बाबतचे आदेश रद्द करण्यात येतील.

16. छरपत्रकातील दर लिहताना खाडाखोड ओव्हर रायटींग करू नये, झाल्यास सुवाच्या अक्षरात दर लिहुन बाजुला संक्षिप्त स्वाक्षरी करावी.

17. महाविदयालयाने विहित नमुन्यातील पुरवठा केलेल्या दरपत्रकावरच दर लिहणे आवश्यक आहे.ईतर कागदपत्राचा किंवा स्वत;च्या लेटरहेडचा उपयोग करू नये.

18. को-या दरपत्रकाची किंमत रू. 100 चा रोख भरणा केल्यास कार्यालयीन वेळेत दि 01.04.2019 पासून दि.10.04.2019 पर्यत सुट्टीचे दिवस वगळता मिळु शकतील.

19. सिलबंद दरपत्रक स्विकारण्याची अंतिम तारीख दिनांक 10.04.2019 वेळ सायंकाळी 5.00 वाजेपर्यत राहील.यानंतर आलेली दरपत्रके स्विकारले जाणार नाहीत.

20. वरील दरपत्रकामध्ये बदल करणे किंवा दरपत्रकाच्या अटी व शर्तीमध्ये दूरूस्ती करणे, एक किंवा अनेक दरपत्रके स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणे अथवा स्थगीत ठेवणे. याबाबतीतचे सर्व अधिकार प्राचार्य यांचेकडे राखून ठेवले आहेत.

21. निविदाधारकाच्या अन्नधान्य सॅम्पलची चौकाशी करूनच निवीदा स्विकारणे अथवा नाकारणे या बाबतचे सर्व अधिकार प्राचार्य निम्नस्वाक्षरीतांकडे राखुन ठेवलेले आहेत.

दरपत्रक दाखल करणार
कॅन्टीन चा शिक्का

प्राचार्य
श्री. तु.भ.अभि.महाविद्यालय,
तुळजापूर

Scanned by CamScanner

श्री तुळजा भवानी मंदीर संस्थान संचलीत

# श्री तुळजा भवानी अभियांत्रिकी महाविद्यालय,

## तुळजापूर 413601 जि. उस्मानाबाद

Ph No. 02471 243603. Email- stbcet@gmail.com Web – www.stbcet.org.in

### दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असले बाबतचे प्रमाणपत्र

मी /आम्ही ...................................................असे वचन देतो की, मला आम्हाला या

दरपत्रकातील नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती / नियम मान्य आहेत.

दरपत्रक दाखल करणाराची सही

कॅटीन शिक्का

प्राचार्य

श्री. तु.भ.अभि.महाविद्यालय,

तुळजापूर

Scanned by CamScanner